महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# कवीसंमेलन, परिसंवाद आणि गप्पांची मैफल

Oct 26, 2012, 01.28AM IST

चिपळूण साहित्य संमेलनाचा कार्यक्रम जाहीर

म . टा . प्रतिनिधी , मुंबई

८६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ११ ते १३ जानेवारी २०१३ या कालावधीत चिपळूण येथे होणार आहे . संमेलनाच्या निमित्ताने रत्नागिरी जिल्ह्यात साहित्याचा गजर दुमदुमणार असून डिसेंबरपासूनच विविध साहित्यिक उपक्रम आखण्यात आले आहेत . मुख्य संमेलनादरम्यान चर्चा , व्याख्याने , पुस्तक प्रदर्शने , नव्या पुस्तकांचे प्रकाशन समारंभ , मुलाखती , साहित्यिकांच्या गाठीभेटी असे कार्यक्रम होणार आहेत .

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने गुरुवारी मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकार परिषद घेऊन तीन दिवसांचा कार्यक्रम जाहीर केला . महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे , कार्यवाह उज्ज्वला मेहेंदळे आणि कोषाध्यक्ष गुरुनाथ दळवी यावेळी उपस्थित होते . जानेवारीच्या १० तारखेपासूनच रत्नागिरी जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून ग्रंथदिंड्या निघणार आहेत . तरुण पिढीला पर्यावरणाबाबत जागरुक करण्याच्या उद्देशाने पर्यावरण दिंडी काढण्यात येणार आहे . संमेलन स्थळाला ' स्व . यशवंतराव चव्हाण नगरी ' असे नाव देण्यात येणार असून विविध प्रवेशद्वारांना कोकणातील नामवंत साहित्यिकांची नावे देण्यात येणार आहेत . चिपळूणातील लोकमान्य वाचनालयाच्या वतीने हे संमेलन होणार आहे .

असे असतील कार्यक्रम

शुक्रवार , ११ जानेवारी : दुपारी उद्घाटन समारंभ , त्यानंतर कवी संमेलन

शनिवार , १२ जानेवारी : अशोक नायगांवकर आणि रामदास फुटाणे यांच्या गप्पांची मैफल ;

' आमच्या रेषा बोलतात भाषा ', ' यशवंतराव चव्हाण यांचे विचारविश्व आणि आजचा महाराष्ट्र ', ' जागतिकीकरण आणि आजची मराठी कादंबरी ', ' आम्ही काय वाचतो , का वाचतो ' या विषयांवर परिसंवाद ; संगीतकार कौशल इनामदार यांचा ' अमृताचा वसा ' हा मराठी कवितांवर आधारित रविवार , १३ जानेवारी : मुलांसाठी बालजल्लोष ; ' विदेशात मराठीचा जागर ' या विषयावर परिसंवाद , अमेरिकास्थित मंदार जोगळेकर यांच्या विशेष प्रयत्नाने होत असलेल्या या परिसंवादात अमेरिका , कॅनडा , इंग्लंड , ऑस्ट्रेलिया , इस्रायल , आखाती देशातील मराठी व्यक्तींचा सहभाग ; ' कार्यकर्त्यांच्या शोधात साहित्यसंस्था ' हा खास तरुणवर्गासाठी परिसंवाद ; मराठी चित्रपटाच्या शताब्दी वर्षानिमित्त कलादिग्दर्शक नितिन देसाई यांच्या अध्यक्षतेखाली ' मराठी साहित्य आणि चित्रपटसृष्टी ' या विषयावर परिसंवाद ; संध्याकाळी नामवंत कथाकारांचे कथाकथन

प्रतिनिधी नोंदणी सुरू

चिपळूण साहित्य संमेलनासाठी प्रतिनिधींची नोंदणी सुरू झाली आहे . तीन दिवसांच्या निवास आणि भोजन व्यवस्थेसाठी अडीच हजार रु . तर केवळ भोजन आणि चहापानाच्या व्यवस्थेसाठी एक हजार रु . शुल्क आहे . ग्रंथप्रदर्शनासाठी दोनशेहून अधिक गाळे असून तीन दिवसांचे गाळयांचे शुल्क ५ , ५०० रु . असेल . संपर्क : २३८०११९९ .